# महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ

(स्वायत्त) (ISO: ९००१:२०१५) (ISO/IES: २७००१-२०१३)
शासकीय तंत्रनिकेतन इमारत, चौथा मजला, ४९, खेरवाडी, बांद्रा (पूर्व), मुंबई - ४०० ०५१.
दूरध्वनी क्र.: ०२२-६२५४२१०० / १६१ / १७०
Email: secretary@msbte.com Web: www.msbte.org.in

जा.क्र.मरातंशिमं/D-५१/एकवेळ संधी /२०२४/4003 दिनांक:- - 4 JUL 2024

प्रति,
प्राचार्य,
अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद मान्यता प्राप्त
अभियांत्रिकी पदविका तसेच वास्तुशास्त्र अभ्यासक्रम
राबविणाऱ्या मंडळाशी संलग्न सर्व संस्था

**विषय: 'I' Scheme अभ्यासक्रमांतील विद्यार्थ्यांना पाचवे व सहावे सत्र पूर्ण करण्याची एक वेळ संधी देण्याबाबत. (OTO)**
**संदर्भ: मंडळाचे परीक्षा विषयक नियमावली नियम RG ७-C**

शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून खालील # अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद मान्यता प्राप्त पदविका अभियांत्रिकी पदविका तसेच वास्तुशास्त्र अभ्यासक्रम मंडळाने सुधारीत करून 'K' Scheme राबविण्यास सुरूवात केली आहे. त्यामुळे अशा अभ्यासक्रमांसाठी शैक्षणिक वर्ष २०२४ - २५ मध्ये प्रथम ते चतुर्थ सत्र 'K' Scheme अभ्यासक्रमाचे असून केवळ पाचवे व सहावे सत्र 'I' Scheme अभ्यासक्रमाचे आहे. त्यामुळे 'I' Scheme च्या अभ्यासक्रमासाठी शैक्षणिक वर्ष २०२४-२५ हे अंतिम वर्ष आहे.
# अभ्यासक्रमांची नांवे खालीलप्रमाणे आहेत.

| Program Group | Program Code | No. of Program |
|---|---|---|
| Civil Engineering | CE / CR / CS / LE | 4 |
| Mechanical Engineering | ME / AE / PG / MK | 4 |
| Electrical Engineering | EE / EP | 2 |
| Electronics Engineering | IE / EJ / ET / EN / DE / MU / TE / EX / AO | 9 |
| Computer Engineering | CO / CM / IF / CW / AN / BD / IH / HA | 8 |
| Chemical Engineering | CH / PO | 2 |
| Instrumentation Engineering | IS / IC | 2 |
| Textile Engineering | TC / TX / DC | 3 |
| Agriculture Engineering | AL | 1 |
| AICTE Diversified | AA / DD / FC / HM / ML / TR / SC/ PN | 8 |
| Mininig Engineering | MN / MZ | 2 |
| | **Total** | **45** |

'I' Scheme अभ्यासक्रमात प्रवेश घेतलेल्या तथापि चतुर्थ सत्राचा निकाल Fail/LSP असल्यामुळे सन २०२४-२५ मध्ये पाचव्या सत्रात प्रवेश घेण्यास अपात्र असलेल्या विद्यार्थ्यांना 'I' Scheme अभ्यासक्रमांतच सत्र पूर्ण करण्याची एक वेळ संधी (One Time Opportunity) खालील अटींच्या अधीन राहून देण्यात येत आहे.

१. सदरची संधी केवळ सत्र पूर्ण करून घेण्यासाठीच आहे. पाचवे सत्र जे विद्यार्थी मंडळाच्या परीक्षा नियम RG 6 नुसार पूर्ण करतील त्यांनाच सहाव्या सत्रात प्रवेश देण्यात येऊन सहावे सत्र पूर्ण करून घेण्याची संधी द्यावी.

२. पाचव्या सत्रात सत्रकर्म पूर्ण न केल्यामुळे जे विद्यार्थी थोपवले जातील (Detained/Disallowed) त्यांनी संधी गमावली आहे, असे समजण्यात यावे व त्यांना सहाव्या सत्रात प्रवेश देऊ नये.

३. सदर संधी अंतर्गत विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यापूर्वी प्राचार्य यांनी स्वत: विद्यार्थ्यांना/पालकांना याबाबत संपूर्ण मार्गदर्शन करावे.

४. हिवाळी परीक्षा २०२४ मध्ये मागील सत्राच्या अनुत्तीर्ण विषयांत जे विद्यार्थी उत्तीर्ण होतील व मंडळाच्या परिक्षा विषयक नियमावलीनुसार पाचव्या सत्राकरिता प्रवेशास पात्र होतील त्यांना उन्हाळी परीक्षा २०२५ पासून पाचव्या/अथवा पाचव्या व सहाव्या सत्राची परीक्षा देता येईल.

५. एकवेळ संधी साठी पात्र विद्यार्थ्यांची यादी संस्थेच्या Log-in मध्ये उपलब्ध केली जाईल. एक वेळ संधी घेऊ इच्छिणा-या विद्यार्थ्यांचे संस्थेने मंडळाच्या Online प्रणालीद्वारे Registration करणे बंधनकारक राहिल. Registration करतांना विद्यार्थ्यांनी शुल्क रु.२००/- तसेच हमीपत्र सादर करणे आवश्यक आहे.

६. विभागीय कार्यालयाने Online द्वारे Registration निश्चित केलेल्या विद्यार्थ्यांनाच एकवेळ संधी देण्यात येईल. याबाबतचे सविस्तर परिपत्रक परिक्षा विभागामार्फत देण्यात येईल.

७. ही संधी केवळ सत्रकर्म पूर्ण करून घेण्यासाठीच असल्याने अशा विद्यार्थ्यांचे परीक्षा अर्ज विद्यार्थी परिक्षेस बसण्यास पात्र होईपर्यंत भरून घेण्यात येऊ नये, याबाबत योग्यती दक्षता घेणेची जबाबदारी संस्थेची राहील. अशा विद्यार्थ्यांचे परीक्षा अर्ज भरून घेऊन त्यांना परीक्षेत बसविल्याचे निदर्शनास आल्यास अशा संस्थांवर दंडात्मक कारवाई करण्यात येऊन त्यांची संलग्नता काढून घेण्याबाबतही शिफारस केली जाईल व विद्यार्थ्यांची परीक्षा रद्द समजण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

८. "One Time Opportunity" मुळे एका विशिष्ठ वर्गात विद्यार्थी संख्या जास्त झाल्यास नियमित तसेच सदर संधी प्राप्त विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये याकरिता संस्थेने वेगळा वर्ग तयार करुन शैक्षणिक कामकाज पूर्ण करावे.

९. या विद्यार्थ्यांचे सत्रकर्म पूर्ण करुन घेण्याची जबाबदारी संस्थेची राहील.

१०. एकवेळ संधी मिळणाऱ्या विद्यार्थ्यांचे मंडळाचे नियमानुसार अर्ज अभिलेखे (Record) ठेवणेची जबाबदारी संस्थेची आहे. तसेच असे रेकॉर्ड आवश्यकतेनुसार सादर केले जाईल असे हमीपत्र संस्थेने देणे आवश्यक आहे.

११. ज्या विद्यार्थ्यांनी सत्र पूर्ण केलेले आहे त्यांनी संबंधीत विषयाचे Termwork / Journal / Drawing / Industrial Training / Project जतन करण्याची जबाबदारी विद्यार्थ्यांची राहील. परिक्षेत पात्र झाल्यावर Oral/Practical परिक्षेचे वेळी सदर Termwork / Journal / Drawing / Industrial Training / Project सादर करणेची जबाबदारी सदर विद्यार्थ्याची राहील.

सहपत्र - १) अर्जाचा नमुना
२) हमीपत्र नमुना - विद्यार्थी
३) हमीपत्र नमुना - संस्था

(डॉ. महेंद्र रा. चितलांगे)
सचिव
म. रा. तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई.

**प्रत :** मा. संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांना माहितीसाठी सादर.

**प्रत माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी:**

१. उपसचिव, परीक्षा विभाग, म.रा.तं.शि.मंडळ, मुख्य कार्यालय, मुंबई यांना माहिती व कार्यवाहीसाठी.
२. उपसचिव, प्रश्नपत्रिका विभाग, म.रा.तं.शि.मंडळ, मुंबई यांना माहिती व कार्यवाहीसाठी.
३. उपसचिव म.रा.तं.शि.मंडळ, मुंबई, विभागीय कार्यालय मुंबई, पुणे, नागपूर, छत्रपती संभाजी नगर यांना आवश्यक कार्यवाहीकरीता.

# अर्जाचा नमुना

(विद्यार्थ्यांने मंडळाच्या विभागीय कार्यालयात संस्थेमार्फत सादर करावा)

प्रति,

----------------------------

----------------------------

----------------------------

(मार्फत — संस्थाप्रमुख)

**विषय:- 'I' Scheme अभ्यासक्रमांतील विद्यार्थ्यांना पाचवे व सहावे सत्र पूर्ण करण्याची एक वेळ संधी देण्याबाबत.**

**संदर्भ :- मंडळाचे परीक्षा विषयक नियमावलीतील नियम RG ७-C नुसार.**

उपरोक्त संदर्भान्वये व विषयानुषंगाने ५ व्या सत्राचे सत्रकर्म पूर्ण करण्याची परवानगी मिळण्याकरिता मी, खाली सही करणार (विद्यार्थी) अर्ज सादर करीत आहे. महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाच्या परीक्षा नियम **RG ४** नुसार मी ५ व्या सत्रात प्रवेश घेण्यास अपात्र आहे. तथापी उपरोक्त संदर्भिय परिपत्रकान्वये, केवळ सत्रकर्म पूर्ण करण्यास संधी देण्यात आली असून मी ............................................................... पदविका अभ्यासक्रमाच्या ५ व्या सत्रात प्रवेश घेऊन **'I' Scheme** प्रमाणे सत्रकर्म पूर्ण करू इच्छितो/इच्छिते. त्या करिता मला परवानगी द्यावी ही विनंती.

मंडळाच्या परिक्षा नियमानुसार पात्र होईन तेव्हाच मला परिक्षेस बसण्याची संधी मिळेल, याबाबत मला संस्थेने जाणीव करून दिलेली आहे. तसेच सत्रकर्म पूर्ण करण्याबाबत मंडळाच्या परिक्षा नियमावलीतील नियम RG ६ मला बंधनकारक आहे, याची मला जाणीव आहे. तसेच यासोबत हमीपत्र सादर करावयाचे आहे, याची मला जाणीव असून हमीपत्रातील सर्व बाबी मला मान्य आहेत.

५ व्या सत्राचे सत्रकर्म पूर्ण करण्याची संधी मला द्यावी, ही विनंती.

आपला/आपली विश्वासू

दिनांक-

स्थळ-

सही-

नांव -

नोंदणी क्र. -

## घोषणा पत्र

मी घोषित करतो/करते की, विद्यार्थ्यास संपूर्ण मार्गदर्शन करण्यात आले असून सर्व संबंधित नियमांची (RG ४ इ.) माहिती करून देण्यात आली आहे. विद्यार्थी संधीचा लाभ घेण्यास उत्सुक आहे. त्या करिता त्याचा अर्ज सादर करीत आहे. तसेच ही संधी घेणाऱ्या विद्यार्थ्याचे अर्ज अभिलेखे (Record) ठेवणेची जबाबदारी संस्था घेत आहे. तसेच आवश्यकतेप्रमाणे ते मागणी केल्यास उपलब्ध करून देण्याची जबाबदारी संस्थेची राहील.

संस्थेचा शिक्का

सही

प्राचार्यांचे नांव-

संस्थेचे नाव -

# UNDERTAKING
## विद्यार्थ्याने संस्थेत द्यावयाचे हमीपत्र

**विषय :- शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये ५ वे व ६ वे सत्र I- Scheme च्या अभ्यासक्रमांत पूर्ण करण्याची संधी ............**

**संदर्भ :- म.रा.तं.शि.मं. परिपत्रक जा.क्र. मरातशिमं/का-५१/संधी/ २०२४ दि. ..................**

उपरोक्त संदर्भिय परिपत्रकान्वये तथा विषयानुषंगाने मी खालीलप्रमाणे हमीपत्र सादर करीत आहे.

१. सदरची संधी मी स्वेच्छेने स्विकारीत आहे.

२. माझा ५ व्या सत्रांतील प्रवेश केवळ सत्रकर्म पूर्ण करण्याकरीता आहे व परीक्षा नियमानुसार मी परीक्षेस बसण्यास जेव्हा पात्र होईन तेव्हाच मला परीक्षा देता येईल.

३. ५ व्या सत्रात मी सत्रकर्म पूर्ण करण्यास असमर्थ ठरल्यास मला थोपविण्यात (Detained) येईल व ६ व्या सत्रात प्रवेश दिला जाणार नाही. तदनंतर मी I-Scheme करिता पात्र नसेन.

४. निर्धारीत कालावधीत मी पदविका पूर्ण करू शकलो/ शकले नाही तर मला मंडळाने घोषित केलेल्या समकक्ष विषयांची परीक्षा द्यावी लागेल.

५. मी संस्थेमध्ये आवश्यक ती शिस्त पाळेन. संस्थेच्या शिस्तीला बाधा येईल असे कोणतेही वर्तन करणार नाही.

६. माझ्या हातुन नियमीत विद्यार्थ्यांना त्रास होईल असे कोणतेही वर्तन होणार नाही जेणेकरून संस्थेच्या शिस्तीचा/नियमांचा भंग होईल असे मी केल्यास माझी ही संधी रद्द केली जाईल याची मला जाणीव आहे.

७. एकवेळ संधीची सुविधा घेत असताना भविष्यात माझा निकाल RHR राहणेची शक्यता आहे, याची मला कल्पना आहे. त्याबाबत माझी कोणतीही तक्रार असणार नाही.

सही -

विद्यार्थ्याचे पूर्ण नांव -
नोंदणी क्र. -
अभ्यासक्रम -

स्थळ :-
दिनांक :-

# UNDERTAKING

## संस्था प्रमुखांनी विभागीय कार्यालयाकडे सादर करावयाच्या हमीपत्राचा नमुना

**विषय** : संस्थेतील 'I' Scheme च्या नियमाप्रमाणे पात्र विद्यार्थ्यांना ५ व्या व ६ व्या सत्रासाठी शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये एक वेळ संधी देण्याबाबत (One Time Opportunity).

**संदर्भ** : मंडळाचे परिपत्रक क्र. MSBTE/D-५१/संधी/२०२४/ दिनांक :

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने मंडळाने संदर्भात नमुद केलेल्या परिपत्रकानुसार आमच्या संस्थेतील खालील तक्त्यामध्ये विद्यार्थ्यांनी शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये पाचव्या-सहाव्या सत्रासाठी एक वेळ संधी अंतर्गत (One Time Opportunity) शिक्षण घेण्याचा विकल्प सादर केलेला आहे. तो खालील तक्त्यात दर्शविला आहे.

| **अ.क्र.** | **नोंदणी क्रमांक** | **विद्यार्थ्यांचे नाव** | **अभ्यासक्रम** | **एक वेळ संधीचा लाभ घेताना विद्यार्थ्यांची शैक्षणिक वर्षनिहाय सत्रनिहाय पूर्वइतिहास** |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

मी, ______________________________ प्राचार्य, ______________________________ खालीलप्रमाणे हमीपत्र सादर करीत आहे.

१. वरील तक्त्यामधील नमुद सर्व विद्यार्थी पाचव्या व सहाव्या सत्राच्या परिक्षांसाठी पात्र होईपर्यंत तथा अभ्यासक्रम पूर्ण करेपर्यंत, त्यांचे या शैक्षणिक वर्षातील सेशनल/टर्मवर्क/प्रात्यक्षिकांचे सी आय अे अे एन मधील नमुद निकषांप्रमाणे विषयनिहाय अभिलेखे (Record) संस्था विहित पध्दतीने जतन करेल.

२. एकवेळ संधी घेणा-या विद्यार्थ्यांनी पाचवे/सहावे सत्रकर्म पुर्ण करण्यास असमर्थ ठरल्यास विद्यार्थ्यांना Detained करण्याची जबाबदारी संस्थेची राहील.

३. एक वेळ संधी घेणा-या विद्यार्थ्यांचे Termwork व Sessional मार्कस् पाचवे सत्राकरीता हिवाळी २०२४ व सहावे सत्राकरिता उन्हाळी २०२५ प्रात्यक्षिक परीक्षे दरम्यान Non-Theory E-mark sheet द्वारे संस्था मंडळाकडे सादर करेल. E-mark sheet व्यतिरीक्त कोणत्याही परिस्थीतीत Termwork व Sessional चे गुण मंडळाकडे स्विकारले जाणार नाहीत.

४. E-mark sheet द्वारे प्राप्त झालेले Termwork व Sessional चे गुण ज्या वेळेसविद्यार्थी परिक्षेस पात्र होईल त्यावेळेस सदर गुण मंडळाद्वारे विद्यार्थ्यास गुणपत्रिकेत प्रदान करण्यात येतील याची मला जाणीव आहे.

स्थळः

दिनांक :

संस्थेचा शिक्का

स्वाक्षरीः-

प्राचार्यांचे नावः-

संस्थेचे नावः-